परळी तालुक्यातील लोकसंख्या : एक भौगोलिक अभ्यास

१.१ प्रस्तावना :-

प्राचीन काळात भूगोलामध्ये मुख्यत: प्राकृतीक पर्यावरणाच्या अध्ययनाला महत्वाचे स्थान होते. पण ज्याप्रमाणे काळ बदलत होता त्याप्रमाणे भूगोलाच्या अध्ययनाचे स्वरूप बदलत होते. भूगोलात मानवी भूगोल या शाखेचा नव्याने समावेश करण्यात आला होता. १९ व्या शतकात जर्मन भूगोल तज्ञ फेड्रीक रॅटझेल यांच्या कार्यातून झालेला आढळतो. म्हणूनच त्यांना मानवी भूगोलाचे जनक म्हणून संबोधले जाते. प्राकृतिक भूगोलात मानव सहअध्ययनाचा विषय बनून राहिला होता. पण आता मानवी भूगोलात मानव केंद्रस्थानी धरून अध्ययन केले जावू लागले. प्राचीन काळापासून लोकसंख्येचा प्रश्न विज्ञानाच्या विविध शाखांना आकर्षित करणारा आहे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांचे नगराच्या संबंधी संतूलित लोकसंख्येच्या विचार लोकसंख्याच्या अध्यनासाठी महत्त्वाचे आहेत.

सुरुवातीच्या काळात एखाद्या क्षेत्रावर किती लोकसंख्या होती व किती वाढ झाली एवढाच अभ्यास केला जात असे. पण जसे-जसे अध्ययन क्षेत्र बदलत गेले तसतसे लोकसंख्या अध्ययनाच्या पद्धती बदलत गेल्या. याच कालखंडात १७९८ साली थॉमस माल्थस या विचारवंताने लोकसंख्येविषयी सिद्धांत मांडून लोकसंख्या अध्ययनाकडे सर्वांचे लक्ष वेधले.

सामाजिक विज्ञानात लोकसंख्येचा अभ्यास हा भूगोल शास्त्राचा मुख्य विषय झाला आहे. लोकसंख्या अध्ययनाचे हेतू काळाप्रमाणे बदलत जात आहेत. (Wood १९७०) ज्या प्रदेशात लोकसंख्या कोणत्या प्रकारची आहे त्या प्रकारचा विकास त्या प्रदेशात झालेला दिसून येतो.

१९५३ साली त्रिवार्था यांनी अमेरिकेत भरलेल्या परिषदेत लोकसंख्या भूगोलास भूगोलाच्या एका नविन भूगोल शाखेच्या रूपात प्रस्तुत केले. म्हणून १९५३ हे वर्ष भूगोलात विभाजक वर्ष म्हणून ओळखले जाते. जगातील सरासरी ६५ टक्के

लोकसंख्या ग्रामीण भागात तर ३५ टक्के शहरी भागात वास्तव्य करते. तर भारताचा विचार केल्यास २०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये ग्रामीण लोकसंख्या ७५.४२ टक्के असून शहरी लोकसंख्या २४.५८ टक्के एवढी आहे. त्यामुळे लोकसंख्येच्या असमान वितरणासंबंधी अध्ययन करणे गरजेचे आहे.

१.२ लोकसंख्या भूगोलाची संकल्पना :

लोकसंख्या भूगोल मानवी भूगोलाची एक अत्यंत प्रगत शाखा म्हणून ओळखली जाते. लोकसंख्या भूगोलात अध्ययनाचा मुख्य बिंदू मानव आहे. मानवासंबंधी असणारे वैशिष्ट्ये म्हणजे मानवी संस्कृती, आर्थिक क्रिया, निसर्गाशी असणारे परस्परसंबंध यातून विविधतेची कल्पना येते. लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचे अध्ययन लोकसंख्या भूगोलात होते. प्रदेशानुसार हे वैशिष्ट्ये बदलत असतात त्याचे संबंध प्राकृतिक आणि सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांशी असतात.

"लोकसंख्या भूगोल वितरण, संघटन, स्थलांतर आणि लोकसंख्येची वृद्धी यांच्याशी संबंधीत आहे" (क्लार्क १९६५). लोकसंख्या भूगोलास भूगोलाची एक महत्वपूर्ण शाखा म्हणून विकसित करण्याचे कार्य सर्वप्रथम जी.टी. त्रिवार्थांनी केलेली असल्यामुळे त्यांना "लोकसंख्या भूगोलाचे जनक" या नावाने संबोधले जाते. त्रिवार्थानंतर लोकसंख्या भूगोलाच्या विकासात जे.आय. क्लार्क, झेलिन्स्की, बिजू गार्नियर, मेलेझीन व डी.आय. बैन्लटी यांनी महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. लोकसंख्या भूगोलात लोकसंख्या वाढ, वितरण, स्थलांतर, लोकसंख्या घनता, लोकसंख्या धोरण, लोकसंख्या इ. समस्या यांचा अभ्यास भौगोलिक दृष्टीकोनातून केला आहे.

१.३ लोकसंख्या भूगोलाच्या व्याख्या

१. जी.टी. त्रिवार्था (१९५३) यांच्या मते -

"वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशातील विविध मानवी समुहांची वैशिष्ट्ये समजावून घेणे म्हणजे लोकसंख्या भूगोल होय."

२. ए. मेलेझीन (१९६३) यांच्या मते -

"लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्या गट व त्यांचे जाळे, त्यांचे एकसंघत्व, उपयोगिता आणि समाजाच्या ध्येयांची परिणामकारकता यांच्यातील संबंधाचा अभ्यास होय."

३. विलबर झेलिन्स्की यांच्या मते -

"एखाद्या प्रदेशातील भोगोलिक वैशिष्ट्यांवर लोकसंख्येच्या स्थल व कालपरत्वे बदल होतो. तसेच प्रदेशाच्या भौगोलिक स्वरुपाचा लोकसंख्येवर होणारा परिणाम आभ्यासणे म्हणजे लोकसंख्या भूगोल होय.

४. जे. आय. क्लार्क (१९६५) यांच्या मते-

"लोकसंख्या वितरण, संरचना, स्थलांतर व वाढ यांच्यातील अभिक्षेत्रीय विविधतेचा अभ्यास म्हणजे लोकसंख्या भूगोल होय."

१.४ अभ्यास विषयाची निवड

प्रस्तुत संशोधनासाठी परळी तालुक्याची निवड करण्यात आली. संशोधनाचा विषय "परळी तालुक्यातील लोकसंख्या एक भौगोलिक अभ्यास" हा आहे. अभ्यास क्षेत्रातील भूप्रदेशात सर्वत्र विविधता आहे. परळी तालुक्याचा बहुतांश भाग पठारी व डोंगराळ प्रदेशाचा आहे. या तालुक्याचा सर्व भाग बेसॉल्ट खडकाने व्यापलेल्या दख्खन पठाराचा भूभाग आहे.

या संशोधन अध्ययनात लोकसंख्या वैशिष्ट्यांचा सखोल व संशोधनात्मक अभ्यास केला गेला आहे. लोकसंख्या संरचनेवर त्या प्रदेशातील प्राकृतीक, सामाजिक, आर्थिक घटकांचा कशा प्रकारे प्रभाव पडलेला आहे याचा अभ्यास या विषयांतर्गत करण्यात येणार आहे.

१.५ अभ्यास क्षेत्राची निवड व महत्त्व :

लोकसंख्या वैशिष्ट्यांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी परळी तालुका या अभ्यास क्षेत्राची निवड पुर्ण विचारांती केली आहे. परळी तालुक्यातील लोकसंख्येवर अद्याप संशोधनात्मक अभ्यास करण्यात आला नाही. परळी तालुक्यात भौगोलिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये विविधता आढळते.

बीड जिल्ह्यातील परळी हा एक महत्त्वाचा तालुका आहे. याचे स्वतःचे असे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. कारण येथे शिव वैजनाथ हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक पवित्र स्थळ आहे. परळी तालुका बीड जिल्ह्याच्या पुर्वेस असून त्याला परभणी व लातूर या जिल्ह्यांच्या सीमा आहेत. १५ ऑगस्ट १९९२ पर्यंत परळी तालुका अंबेजोगाई व माजलगाव तालुक्याचा भाग होता. महाराष्ट्रातील मराठवाडा या विभागात तसेच बीड जिल्ह्यातील बालाघाट डोंगररांगादरम्यान आणि वाण, सरस्वती, पद्मावती, गुणवरा, लींगी व भावपरे या नद्यांच्या भागात परळी तालुका आहे.

परळी तालुका १५ ऑगस्ट १९९२ ला वेगळा झाला असुन त्यात जवळपास १०५ गावांचा समावेश आहे. परळी तालुका १८° ४१' ३३" उत्तर अक्षांश ते १९° ०७' ४६" उत्तर अक्षांश आणि ७६° ४१' २७" पुर्व ते ७६° ४१' ४४" पूर्व रेखावृत्त वसलेला आहे. परळी तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ७६७.२० चौ.कि.मी. असुन ग्रामीण भागाचे क्षेत्रफळ ७५९.४० चौ.कि.मी. असुन नागरी भागाचे क्षेत्रफळ ७.८० चौ.कि.मी. आहे. लोकसंख्या भूगोलाच्या अध्ययनाचे उद्देश व महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येते.

१) लोकसंख्या भूगोलामध्ये अभिक्षेत्रीय विश्लेषणाला जास्त महत्त्व असल्यामुळे अभिक्षेत्रानुसार मानव संसाधनाचे अभिक्षेत्रीय वितरण व स्वरुप समजण्यास मदत होते.
२) लोकसंख्या भूगोल अध्ययनामुळे मानवी जिवनासाठी आवश्यक घटकांची माहिती मिळते.

३) लोकसंख्या भूगोलामध्ये मानवी जीवनांच्या अंगभूत वैशिष्ट्यांचा अभ्यास (जनन, मर्त्यता, स्थलांतर, व्यावसायिक रचना, शिक्षण, आरोग्य, धर्म, भाषा) या घटकांचा अभिक्षेत्रानुसार झालेला बदल लक्षात येतो.

४) आधुनिक काळानुसार लोकसंख्येत झालेला बदल भौगोलिक दृष्टिकोनातून लक्षात येतो.

५) लोकसंख्या भूगोलात प्रदेशाच्या विकासाचे गुपीत सांगितले जाते.

६) लोकसंख्या वर्गीकरण भौगोलिक घटकांना अनुसरून करणे.

१.६ संशोधनाची उद्दिष्टे :

परळी तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास करणे हा या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. या उद्दिष्टपुर्तीसाठी पुढील घटकांचा अभ्यास करण्यात आला.

१. परळी तालुक्यातील प्राकृतिक, सामाजिक आणि आर्थिक घटकांचा अभ्यास करणे.

२. परळी तालुक्यातील लोकसंख्येची घनता, वृद्धी आणि वितरणाचा अभ्यास करणे.

३. परळी तालुक्यातील लिंगगुणोत्तर, वयोरचनेचा अभ्यास करणे.

४. अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येची साक्षरता आणि व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे

५. अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा सर्वेक्षणाच्या आधारे अभ्यास करणे.

१.७ गृहितके :

१. परळी तालुक्यातील लोकसंख्येवर प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांचा परिणाम झाला आहे.

२. लोकसंख्या वितरण असमान झाले आहे.

१.८ माहिती संकलन :

प्रस्तुत शोधनिबंधात प्राथमिक व द्वितीय माहिती स्त्रोतांचा उपयोग केला आहे. ही माहिती जनगणना पुस्तिका, बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, बीड जिल्हा राजपत्र, नगरपरिषद परळी, शासकीय दस्तावेज, तलाठी कार्यालय पुस्तिका, वार्षिक अहवाल, नगररचना विभाग, जनन व मर्त्यता या संबंधी माहिती ग्रामपंचायत कार्यालय येथून मिळवली जाईल. प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, पुस्तके व वर्तमानपत्रे याद्वारे माहिती संकलन केले जाणार आहे.

प्राथमिक स्वरूपाची माहिती काही निवडक गावांची नमुना निवड करून प्रश्नावलीच्या आधारे संकलीत केली जाणार आहे.

१.९ संशोधन पद्धती :

संशोधनात्मक अध्ययन करण्यासाठी सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

लोकसंख्या घनता -

अ) गणितीय घाता = $\frac{\text{एकुण लोकसंख्या}}{\text{एकूण क्षेत्रफळ}}$

ब) लिंगगुणोत्तर = $\frac{\text{एकुण लोकसंख्या}}{\text{एकूण क्षेत्रफळ}} \times १०००$

क) साक्षरता = $\frac{\text{एकूण साक्षर लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$

ड) लोकसंख्या वाढ = $r = \frac{(Pn - Po)}{Po} \times 100$

r = लोकसंख्या वाढ

Pn = चालू दशकातील लोकसंख्या

Po = मागील दशकातील लोकसंख्या

१.१० भविष्यकालीन कामाचे नियोजन :

प्रथम वर्षाचे नियोजन :

१. साहित्याचे पुनरावलोकन :

यामध्ये अभ्यासाची उद्दिष्टे, निवडलेल्या विषयासंदर्भातील प्रकाशित, अप्रकाशित साहित्य, शोधप्रबंध, शोधपत्रिका आणि शासकिय कार्यालये यामधून माहिती संकलन करणे.

२. क्षेत्रीय अभ्यास आणि माहितीचे संकलन :

यामध्ये विविध स्त्रोतांच्या द्वारे प्राथमिक आणि द्वितीयक माहिती ही अभ्यास व विविध पद्धतीच्या साह्याने मिळविणे.

द्वितीय वर्षाचे नियोजन :

यामध्ये संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण तक्ते, सांख्यिकीय पद्धतीच्या साह्याने करणे, तसेच नकाशाशास्त्रीय पद्धत इत्यादींच्या साह्याने माहितीचे विश्लेषण करणे.

१. माहितीचे विश्लेषण
२. प्रबंधाचे लेखन व सादरीकरण करणे

१.११ साहित्याचे पुनरावलोकन :-

संशोधन कार्य करताना संशोधनास योग्य दिशा ही साहित्याच्या पुनरावलोकनातून मिळते. साहित्याच्या माध्यमातून अभ्यासाच्या माध्यमातून विषयाची व्याप्ती समजते. जगातील विविध देशात लोकसंख्या भूगोलाचा अभ्यास करण्यात आला आहे.

१९६२ साली "Population Geography" या पुस्तकात Clarke, John J. यांनी लोकसंख्या वैशिष्ट्यांवर परिणाम करणा-या घटकांचे विश्लेषण केले आहे. Zelinsky, W. यांनी १९६८ साली "A Prologue to Population Geography" या पुस्तकात एखाद्या प्रदेशातील भौगोलिक लक्षणांची निर्मिती कशा प्रकारे झाली आहे आणि त्याची प्रतिक्रिया, स्थान आणि वेळ या दोन्हीच्या परिवर्तनावर कशी होते यासंदर्भात स्पष्टीकरण केले आहे. Wood, R. यांनी Population Analysis in Geography हे पुस्तक १९९९ साली लिहिले, यामुळे लोकसंख्या अभ्यासाला नविन रूप प्राप्त झाले.

१) Yusuf Khan यांनी १९९० साली पुणे विद्यापीठात शोधप्रबंध सादर केला. हा शोधप्रबंध Western Maharashtra - Study in Population या शिर्षकाचा असून यामध्ये लोकसंख्या वैशिष्ट्यांचे अध्ययन केले आहे.

२) Koshal R. and Shivshashtri R.K. यांनी १९९८ साली Change in Sex Ratio of Sonai District या शोधप्रबंधात लिंगगुणोत्तराचा अभ्यास केला आहे.

३) Gatade D.G. यांनी Geographical Analysis of Rural Population Concentration in Maharashtra या शोधनिबंधात ग्रामीण लोकसंख्येच्या वितरणाचे अध्ययन केले आहे.

४) C.S. Barade यांनी २००१ साली An Analysis of Population Problems in Goa या शोधप्रबंधात गोव्यातील लोकसंख्येच्या समस्याचे विश्लेषण केले.

५) Dahiwale S.B. यांनी २००६ साली विदर्भातील गोंदिया जिल्ह्यातील लोकसंख्येचे अध्ययन केले.

६) Kamble S.N. यांनी "लातूर व नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांची तुलना : एक भौगोलिक अभ्यास" या शिर्षकांतर्गत लोकसंख्येचा अभ्यास केला.

७) Jawle V.G. यांनी "औसा तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास (लातूर जिल्हा)" या शिर्षकांतर्गत औसा तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला.

८) Bodhle K.K. यांनी "मुखेड तालुक्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास" यांनी लोकसंख्या वैशिष्ट्यांचा सखोल अभ्यास केला आहे.

१.१२ प्रकरण योजना :

प्रकरण पहिले : संकल्पनात्मक मांडणी

प्रस्तुत प्रकरणात लोकसंख्या भूगोलाची संकल्पना, लोकसंख्या भूगोलाच्या व्याख्या, अभ्यास विषयाची निवड, अभ्यास क्षेत्राची निवड व महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, माहिती संकलन, संशोधन पद्धती, प्रकरण योजना.

प्रकरण दुसरे : परळी तालुक्याचे भौगोलिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, स्थान व सिमा, भौगोलिक संरचना, भूजल, भूरचना, जलप्रणाली, मृदा, हवामान, भूमी उपयोजन, नागरीकरण, रेल्वे वाहतूक, उद्योगधंदे विकास, रस्ते वाहतूक.

प्रकरण तिसरे : अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येचे वितरण, घनता आणि वाढ

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, लोकसंख्येला प्रभावित करणारे घटक, लोकसंख्येची घनता, लोकसंख्या वितरण, लोकसंख्येची दशवार्षिक वाढ, सारांश.

प्रकरण चौथे : अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येची संरचना

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, लोकसंख्येची लिंगरचना आणि वयोगट रचना.

प्रकरण पाचवे : अभ्यास क्षेत्रातील साक्षरता आणि व्यावसायिक रचना

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, साक्षरता आणि व्यावसायिक रचना.

प्रकरण सहावे : अभ्यास क्षेत्रातील निवडक गावातील सर्वेक्षण

प्रस्तुत प्रकरण हे गावातील सर्वेक्षणासंदर्भात असून अभ्यास करण्यासाठी परळी तालुक्यातील पाच मंडळातील प्रत्येकी तीन गावाची नमुना निवड करून त्यांचा सर्वेक्षणाअंतर्गत लोकसंख्या वैशिष्ट्यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि उपाययोजना

संदर्भसूची

१) सिंह काशीनाथ एवं सिंह जगदीश (१९७५) : मानव और आर्थिक भूगोल, तारा पब्लिकेशन, वाराणशी

२) घारपूरे वि.त्र्यं. : लोकसंख्या भूगोल, पिंपळापूरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर.

३) Chandna, R.C. (१९९४) : Geography of Population : Concepts, Determinants and Patterns, Kalyani Publication, New Delhi.

४) Chandna, R.C. (१९७६) : Population Growth of India Cities, १९७०-७१, Asian Profile, Vol. ४, No. १

५) Deshpande C.D. (१९७१) : Geography of Maharashtra, National Book Trust Publication, New Delhi.

६) Deware, R.S. (२००५), A Geographical Study of Malegaon City, Unpublished Thesis, Rashtrasanta Tukadoji Maharaj University, Nagpur.

७) Ghosh, B. N. (१९८५) : Fundamental of Population Geography, Sterling Publication, New Delhi.

८) Government of India (२००१), Census Handbook, Beed district, Published by Census of India.

९) Government of India (२०११), Primary Census Handbook-Beed, Published by Census of India.

१०) Government of Maharashtra - २००१, District Statistical Abstract and Socio-Economic Review, Beed District.

११) Joshi S.C. and Arya N.D. (१९८१), "Trends of Population Growth and Urbanisation in the Tarai and Bhabar Zone at Uttar Pradesh since Independence" NAGI, ३rd Indian Geographical Congress, New Delhi.

१२) Kulkarni, K.M. (१९८१) : "Pattern of Urban Growth in India - some Crop Regional Profiles", Transaction of IIIG, Pune Vol. ३, PP. १३-२०.

१३) Patil Vilas (२०००) : "Socio-economic Characteristics of Rural Population - A Case Study of Sidhudurg District", Unpublished Ph.D. Thesis, University of Pune.

१४) www.beed.nic.in

१५) www.maharashtra.gov.in

१६) www.parli.nic.in

संशोधक विद्यार्थी | मार्गदर्शक

कैलास भास्कर लव्हाळे | **प्रा.डॉ. चिमनगुंडे विश्वराज श्रीरामराव**

परळी तालुक्यातील लोकसंख्या : एक भौगोलिक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत
पीएच.डी. (भूगोल) पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

संशोधक विद्यार्थी

कैलास भास्कर लव्हाळे

M.A., M.Phil, SET

मार्गदर्शक

प्रा.डॉ. चिमनगुंडे विश्वराज श्रीरामराव

M.A., B.Ed., M.Phil, Ph.D.

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड

जि. परभणी

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर - ४१३५१२

एप्रिल २०१९